सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : १८९ | बुधवार, दि. १ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com




## दिनविशेष

०१ एप्रिल

- भारतीय सैन्याची स्थापना.
- पुणे वेधशाळेचे काम सुरू झाले.
- रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची (RBI) स्थापना.
- ओरिसा राज्याची स्थापना.
- गीतरामायणातील पहिले गाणे पुणे आकाशवाणीवरुन प्रसारित झाले. या दिवशी रामनवमी होती.
- भारतात दशमान पद्धतीचा वापर सुरू झाला.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतरत्न प्रदान.
- गूगलने जीमेल ही ई-पत्र प्रणाली सुरू केली.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

### आशियातील १४ देशांनी वेढलेला एकमेव देश कोणता?

पान ३ वर


# मिशन सुधार योजनेंतर्गत आढळले अन्नसुरक्षेचे बोगस लाभार्थी

## शासनाकडून अपात्रतेची कारवाई केली जाणार

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : शासनाच्या मिशन सुधार योजनेंतर्गत कठोर पावले उचलण्यात आली आहेत. त्यामध्ये अन्नसुरक्षेचे बोगस लाभार्थी आढळून आले आहेत. या बोगस लाभार्थ्यांना अपात्र केले जाणार आहे. लोकसंख्या आणि नागरिकांचा आर्थिक स्तर पाहता अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांची संख्या भरपूर प्रमाणात दिसून आली, त्या प्रमाणात शासन मोफत धान्य वाटप करीत आहे. आधार कार्ड, पॅन कार्ड आणि बँक खाते लिंकिंग झाल्याने आता सत्य उजेडात येऊ लागल्याने शासनाने मिशन सुधार योजना अमलात आणली असून, बनावट लाभार्थी शोधणे सुरू केले आहे.

शासनाकडून लाभ घेऊन धान्याची लूट सुरू होती. त्यामुळे खरे लाभार्थी वंचित राहत असल्याच्या अनेक तक्रारी होत्या. अनेक दिवस




लाभ न घेतलेले रेशन कार्ड, दोन वेगवेगळ्या गावांना असणारे रेशन कार्ड, आयकर भरणारे नागरिक, दोन एकरांपेक्षा अधिक शेतजमीन असणारे नागरिक, काही संस्थांचे, कंपनीचे मालक अथवा संचालक, वाहनांचे मालक, आधार संशयित, मृत लाभार्थी, १०० वर्षे वयावरील लाभार्थी, १८ वर्षांखालील लाभार्थी आदी निकषांवर अमळनेर तालुक्याची ३७ हजार संशयित रेशन कार्डांची यादी प्राप्त झाली आहे.

प्राधान्य कुटुंबासाठी ग्रामीण भागात ४४ हजार रुपये उत्पन्नाची मर्यादा आहे, तर शहरी भागासाठी ती ५९ हजारांची आहे. मात्र, लाडकी बहीण योजनेंतर्गत मिळणारी रक्कम, निराधार योजनेतून मिळणारी रक्कम याची ऑनलाईन पडताळणी केली असता असे लाभार्थी देखील अपात्र ठरणार आहेत. त्याचप्रमाणे संशयित लाभार्थ्यांची तपासणी करण्यात येणार असून, त्यांची नावे रेशन कार्ड अन्नसुरक्षा लाभार्थी यादीतून वगळण्यात येणार आहे.

> **संशयित रेशन कार्ड धारकांनी खोटे न बोलता स्वत:हून खरी माहिती देऊन लाभार्थी योजनेतून नावे काढून घेतल्यास त्यांच्यावर कारवाई न करता पांढरे रेशन कार्ड देण्यात येईल. *अन्यथा शासनातर्फे कारवाई केली जाईल.***
> – **रुकसाना शेख,** पुरवठा निरीक्षण अधिकारी, अमळनेर.

> **शासनाने आता सर्वच व्यवहार पारदर्शी केले आहेत. त्यामुळे मिशन सुधार योजनेत प्रत्येकाचे उत्पन्न, आयकर, विविध योजनांच्या रूपाने जमा होणारा पैसा हे सारे सत्य उजेडात येत आहे. नागरिकांनी स्वत:हून रेशन कार्ड जमा करून पांढरे रेशन कार्ड घ्यावे. अन्यथा नावे अपात्र केली जातील.**
> – **रूपेशकुमार सुराणा,** तहसीलदार, अमळनेर.



***अमळनेर : यावल येथील तुबा नाज हेल्प सोसायटीच्या वतीने जळगाव येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील अल्पबचत भवनात आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार स्वीकारताना द्रौ. रा. कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सीमाताई सूर्यवंशी.***

# मुख्याध्यापिका सौ. सीमाताई सूर्यवंशींना राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार प्रदान

## अमळनेरमधील द्रौ. रा. कन्या शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित श्रीमती द्रौ. रा. कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सीमाताई सुरेंद्र सूर्यवंशी यांनी शिक्षण क्षेत्रात सलग ३६ वर्षे उपशिक्षिका व मुख्याध्यापिका पदावर कार्यरत असताना उल्लेखनीय योगदान दिले. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना नुकताच २०२५-२६ या वर्षासाठीचा श्रीमती कस्तुरबा गांधी राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, सुवर्णपदक व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. या पुरस्कारामुळे येथील द्रौ. रा. कन्या शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

यावल येथील तुबा नाज हेल्प सोसायटीच्या वतीने जळगाव येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील अल्पबचत भवनात आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात सौ. सीमाताई सूर्यवंशी यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. उपजिल्हाधिकारी मनोज देशमुख कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. जळगाव जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी पतपेढी (ग. स. सोसायटी)चे संचालक व गटशिक्षणाधिकारी विजय शांतीलाल पवार, पालघरचे कृषी अधिकारी सतीश बाविस्कर, क्रीडापटू फारुख शेख आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सौ. सीमाताई सूर्यवंशी यांना या मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या पुरस्काराबद्दल खानदेश शिक्षण मंडळ या संस्थेची

# चैत्र पौर्णिमेनिमित्त आज शिरूडला सप्तशृंगी यात्रोत्सव

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तालुक्यातील शिरूड येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही चैत्रपौर्णिमेनिमित्त बुधवारी, दि. १ एप्रिल रोजी सप्तशृंगी माता यात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. या उत्सवानिमित्त गावात सध्या भक्तिमय वातावरण निर्माण असून, ग्रामस्थांकडून जय्यत तयारी सुरू आहे.

यात्रेनिमित्त पहाटे ५ वाजता दिवे-आरत्या व ध्वजासह पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणुकीची सुरूवात केली जाते. दुपारी ४ नंतर बैलगाड्यांवरून विशेष आकर्षक मिरवणूक काढली जाते. एका बैलगाडीरूपी तगतरावावर नृत्य करीत मिरवणूक तर दुसऱ्या बैलगाडीवर 'वगदा' व 'वगदी' ही दोन पारंपरिक बाहुले टांगून उंच टोकावर बांधून गोल फिरवत संपूर्ण गावभर फिरविले जातात. या अनोख्या परंपरेमुळे यात्रेला विशेष रंगत प्राप्त होते. त्यानंतर ही मिरवणूक मंदिराकडे वळते आणि यात्रेला औपचारिकपणे सुरूवात होते.

मंदिर परिसरात पूजा-अर्चा, अभिषेक व आरती यांचे आयोजन




***अमळनेर : तालुक्यातील शिरूड येथील सप्तशृंगी माता मंदिर.***

केले जाणार असून, काही ठिकाणी पारंपरिक वगनाट्य सादर केले जाणार आहे. याप्रसंगी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून सप्तशृंगी मातेला नमन करतील. यात्रेच्या पार्श्वभूमीवर शिरूडमध्ये ठिकठिकाणी आकर्षक रोषणाई व सजावट करण्यात आली आहे. तसेच भाविकांसाठी पिण्याचे पाणी, शीतपेय तसेच इतर आवश्यक सुविधांची व्यवस्था तरुण मित्रमंडळ, ग्रामस्थ व यात्रा समितीकडून करण्यात आली आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता वाहतूक व सुरक्षेची विशेष खबरदारी घेण्यात आलेली आहे. या यात्रेमुळे शिरूडमध्ये धार्मिक उत्सवासोबतच सामाजिक ऐक्याचे दर्शन घडणार असून, परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# 'जलजीवन मिशन'ची कामे पूर्ण होऊनही निधीअभावी पाणीपुरवठा योजना वाऱ्यावर

## अमळनेर तालुक्यातील स्थिती; सहा ते सात गावांत पाणीटंचाई

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तालुक्यातील अनेक गावांमध्ये जलजीवन मिशन योजनेंतर्गत कामे पूर्ण होऊनही निधी मिळालेला नाही. त्यामुळे संबंधित ठेकेदारांची बिले थकली असून, वीजजोडणीही प्रलंबित आहे. याचा परिणाम म्हणजे काही गावांमध्ये पाणीपुरवठा योजना सुरूच होऊ शकलेली नाही. परिणामी वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर सहा ते सात गावांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. पाणीटंचाईच्या संकटातून दूर होण्यासाठी संबंधित गावांच्या ग्रामपंचायतींनी विहीर व बोअरवेल अधिग्रहण करण्यात यावे, यासाठी प्रशासनाकडे प्रस्ताव पाठविले आहेत.

तालुक्यातील गडखांब, धूपी आणि मांजर्डी या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. ग्रामस्थांसह जनावरांच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण होत



असल्याने सरपंच नितीन पाटील व ग्रामसेवकांनी भाऊसाहेब लोटन पाटील, विजय हिरामण पाटील व मनोज हिरामण पाटील या शेतकऱ्यांच्या विहिरी अधिग्रहीत करण्याचा प्रस्ताव गटविकास अधिकाऱ्यांकडे पाठविला आहे. धानोरा (भोरटेक) येथेही पाणीटंचाई जाणवत असून, सरपंच गोपीचंद दौलत यांनी इंद्रसिंग राजपूत यांच्या बोअरवेल अधिग्रहणाचा प्रस्ताव पाठविला आहे. चौबारी येथेही परिस्थिती गंभीर असून, सरपंच ए. पी. भिल व ग्रामसेवक वासुदेव मारवडकर यांनी भोरटेक शिवारातील मधुकर पाटील यांच्या विहिरीतून पाणीपुरवठा करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. जुनोने येथेही टंचाई वाढत असल्याने ग्रामपंचायतीने फेब्रुवारीतच अधिग्रहण प्रस्ताव पाठविले आहेत.

दरम्यान, अनेक गावांतील जलजीवन मिशन योजनांची कामे निधीअभावी अजूनही अपूर्णावस्थेत आहेत. भोरटेक येथील सोर्स व पंपिंग काम पूर्ण असून, वीजजोडणीअभावी योजना सुरू झालेली नाही. धानोरा येथे वितरण लाईन पूर्ण असली, तरी पंप हाऊस बाकी आहे. जुनोने योजना पूर्ण आहे, तर चौबारी येथे ८० टक्के काम पूर्ण असून ठेकेदाराचे बिल न मिळाल्याने उर्वरित काम रखडले आहे. गडखांब येथे पंप हाऊसचे कामही अपूर्ण आहे. सहा-सात गावांकडून विहीर व बोअरवेल अधिग्रहणाचे प्रस्ताव प्राप्त झाले असून, ते ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडे पाठविण्यात आले आहेत, अशी माहिती गटविकास अधिकारी एन. आर. पाटील यांनी दिली.

गेल्या दोन वर्षांपासून जलजीवन मिशनचा निधी केंद्राकडून मिळालेला नाही. राज्य सरकारकडून केवळ २० टक्के निधी मिळाला आहे. निधीअभावी ठेकेदार कामच पूर्ण करत नसल्याचे ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपविभागीय अभियंता धीरज पाटील यांनी सांगितले. प्रस्तावांची पडताळणी करून विहीर अधिग्रहण मंजुरीसाठी तहसीलदारांकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# भाषा आणि संस्कारांतून शिक्षण देणे आवश्यक : अलका कुबल

## पोदार स्कूलचे वेशभूषा, फॅन्सी ड्रेस, चित्रकला स्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांत प्रतिभा रुजविणे कौतुकास्पद

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : आजच्या विद्यार्थ्यांना भाषा आणि संस्कारांच्या माध्यमातून शिक्षण देत शाळांनी घडविण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे. मात्र, अलीकडची शिक्षण व्यवस्थेतील स्थिती पाहता प्रतिभा रुजविणारे अर्थात परिपूर्ण शिक्षण दिले जाताना दिसत नाही. येथील नोबेल पोदार लर्न इंग्लिश स्कूलने उद्घाटनप्रसंगीच विद्यार्थ्यांसह समाजातील महिला घटकासाठी आयोजित विविध स्पर्धांतून सांस्कृतिक, शैक्षणिक आणि प्रेरणादायी असा सुंदर संगम घडवून आणला, ही अतिशय कौतुकास्पद बाब आहे. 'मी आई जिजाऊ' या विषयावरील वेशभूषा स्पर्धेने उपस्थितांचे मन जिंकले, हे या स्कूलचे खऱ्या अर्थाने प्रथमयश म्हटल्यास वावगे ठरणार नाही, असे भावोद्गार माहेरची साडी फेम, ज्येष्ठ अभिनेत्री अलकाताई कुबल यांनी काढले.

### अहिराणी शब्दांची जादू, हास्याचा वर्षाव

कार्यक्रमात एक वेगळाच रंग भरला तो अहिराणी मराठी कथाकार तथा 'आयत पोयतं सख्यानं'चे निर्माते तथा समाजभूषण प्रा. प्रवीण माळी सर यांच्या सादरीकरणाने. अहिराणी भाषेतील लग्नाच्या रीतीरिवाजांचे, प्रत्येक तालुका व गावागावांतील बोलीभाषांचे त्यांनी केलेले विनोदी आणि जीवंत चित्रण श्रोत्यांना अक्षरश: पोट धरून हसायला लावणारे ठरले. त्यांच्या या सादरीकरणाने कार्यक्रमात उत्साहाची नवी उंची गाठली.



येथील नोबेल पोदार लर्न स्कूलतर्फे आयोजित दोन दिवसीय विविध स्पर्धांच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात त्या बोलत होत्या. उद्योगपती सुनील झवर, सौ. मृणालताई अमोल पाटील, सौ. शैलजाताई रणजित शिंदे, नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, नगरसेविका सौ. जयश्री अनिलदादा पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सौ. तिलोत्तमाताई पाटील, भाजपच्या प्रदेश चिटणीस सौ. भैरवीताई वाघ-पलांडे, सौ. माधुरीताई पाटील, प्रा. प्रवीण माळी, रील स्टार चेतन कुमावत, साने गुरुजी वाचनालयाचे चिटणीस प्रकाश वाघ प्रमुख

पान २ वर



***अमळनेर : नोबेल पोदार लर्न इंग्लिश स्कूलतर्फे घेण्यात आलेल्या दोन दिवसीय स्पर्धांच्या पारितोषिक वितरण सोहळ्याप्रसंगी ज्येष्ठ अभिनेत्री अलकाताई कुबल यांच्यासमवेत संस्थेचे चेअरमन सौ. अर्चनाताई सूर्यवंशी, भाजपच्या प्रदेश चिटणीस सौ. भैरवीताई वाघ-पलांडे, नगरसेविका सौ. जयश्रीताई पाटील आदी.***



## संपादकीय

# मुले आणि मोबाईलचे व्यसन

आजच्या डिजिटल युगात मुलांच्या जीवनात मोबाईल आणि टॅब्लेट प्रत्येक ठिकाणी दिसतो. मोबाईल हा केवळ संवादाचे साधन राहिलेला नाही, तर तो मनोरंजन, शिक्षण आणि माहितीचा प्रमुख स्रोत बनला आहे. मात्र, या साधनाचा अतिरेकी वापर विशेषतः लहान मुलांमध्ये चिंतेचा विषय ठरत आहे. सतत मोबाईल वापरण्याची सवय ही हळूहळू व्यसनात परिवर्तित होत असून, त्याचे दुष्परिणाम शारीरिक, मानसिक आणि सामाजिक स्तरावर स्पष्टपणे दिसून येत आहेत. मुले दीर्घकाळ मोबाईलमध्ये गुंतलेली राहिल्यामुळे त्यांच्या डोळ्यांवर ताण येतो, झोपेचे चक्र बिघडते आणि शारीरिक हालचाली कमी होतात. यामुळे लठ्ठपणा, दृष्टिदोष आणि इतर आरोग्यविषयक समस्या उद्भवू शकतात. मानसिकदृष्ट्या, मोबाईलवरील गेम आणि सोशल मीडियाचा अतिरेक मुलांच्या एकाग्रतेवर परिणाम करतो, चिडचिडेपणा वाढवतो आणि वास्तवातील नातेसंबंधांपासून दूर नेतो. या पार्श्वभूमीवर पालक म्हणून त्यांचा स्क्रीन टाइम कमी करणे हे आपल्यासमोरचे मोठे आव्हान आहे. 'स्क्रीन टाइम' मर्यादित ठेवून उर्वरित वेळ खेळ, वाचन, कला आणि क्रीडा यांसाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. तसेच पालकांनी मुलांशी संवाद वाढवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. मुले मोबाईलकडे का आकर्षित होत आहेत हे समजून घेऊन त्यांना पर्यायी उपक्रम उपलब्ध करून दिल्यास त्यांचे लक्ष नैसर्गिकरित्या वळवता येते. शाळांनीही या संदर्भात जनजागृती करणे, डिजिटल साक्षरतेबाबत मार्गदर्शन करणे आणि विद्यार्थ्यांना समतोल वापराचे महत्त्व पटवून देणे गरजेचे आहे.

सोशल मीडिया, गेम्स आणि ॲप्समुळे मुले सतत त्यात गुंतलेले राहतात. मात्र, तज्ज्ञ सांगतात, की योग्य मार्गदर्शन आणि साधे नियम वापरल्यास आपण मुलांच्या मनावर सकारात्मक प्रभाव पाडू शकतो. तसेच तरुण मुलींच्या मानसिक आरोग्याला हानी पोहोचेल अशा प्रकारचे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, मेटा आणि गुगलने हेतूपूर्वक बनविल्याचे मत अमेरिकेच्या न्यायालयाने नोंदविले आहे. जर आपण पालक असाल तर या बातमीमुळे निश्चितपणे दिलासा मिळाला असेल. इन्स्टाग्रामचे काही फीचर्स, जसे की सततचे स्क्रोलिंग जाणूनबुजून लोकांना व्यसनात टाकण्यासाठी बनविलेले आहेत, असे काही वकिलांचेही मत आहे. सोशल मीडिया कंपन्यांसाठी न्यायालयाचा निर्णय म्हणजे मोठा बदल म्हणता येईल. पण जगभरातील पालकांना तो मुलांचा स्क्रीन टाइम कमी करण्यासाठी फारसा उपयोगी ठरताना दिसत नाही. मुलांच्या हातातून काही काळासाठी तरी मोबाईल कसा दूर ठेवता येईल, याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. जेव्हा मुले मोबाईल वापरत नसतील तेव्हा ते फक्त चार्जरवर ठेवा, बाकी काही नाही. मोठी मुले आणि किशोरवयीन मुलांवर नियम लादण्याऐवजी त्यांना स्क्रीन टाइमविषयीच्या चर्चेत सहभागी करून घेतल्यास त्याचा फायदा होतो. मुलांच्या सोशल मीडिया दबावाला मान्यता देणे महत्त्वाचे आहे. मुलांशी किंवा टीनएजर्सशी मजबूत नाते निर्माण केल्यास स्क्रीन वापरावर नियंत्रण ठेवणे सोपे होते.

आपण मुलांशी चांगले नाते ठेवायला हवे. कारण त्यातूनच सहकार्य आणि टीमवर्क साध्य होऊ शकते. यामध्ये मुले ऑनलाईन काय पाहतात, त्यात खरोखर लक्ष देणे महत्त्वाचे आहे. बऱ्याच पालकांना सोशल मीडियावरील बदलत चाललेले ट्रेंड्स समजायला अवघड वाटतात. पण स्क्रीन टाइमविषयी मोकळ्या चर्चेतून पालक आणि मुले एकमेकांकडून शिकू शकतात. आपणही मुलाला असे विचारू शकता, की तुला काय वाटते, सोशल मीडिया कसे काम करते? हे ॲप लोकांना सतत पाहत राहण्यासाठी कसे बनविले आहे? तुला माहिती आहे का, लोक जास्त वेळ घालवतात म्हणून त्यांना पैसे मिळतात? पालक आपल्या मुलांना डिजिटल ज्ञान प्रत्यक्ष अनुभवातून शिकवू शकतात. आपण काही गोष्टी एकत्र पाहू शकता. तसेच ठीक आहे, तुला वाटते हे खरे आहे का? हे खरे आहे की नाही हे मला कसे समजेल? असे विचारू शकता. मुले त्यांच्या पालकांच्या वर्तनाचे अनुकरण करतात हे आता गुपित राहिलेले नाही. त्यामुळे मुलांमध्ये चांगल्या स्क्रीन सवयी रुजवायच्या असतील, तर पालकांनी आधी स्वतःवर लक्ष देणे गरजेचे आहे. शाळांनीही यासंदर्भात जनजागृती करणे, डिजिटल साक्षरतेबाबत मार्गदर्शन करणे आणि विद्यार्थ्यांना समतोल वापराचे महत्त्व पटवून देणे गरजेचे आहे. शेवटी मोबाईल हा शत्रू नसून त्याचा अतिरेकी वापरच समस्या आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. योग्य नियंत्रण, मार्गदर्शन आणि समजूतदारपणा यांच्या सहाय्याने आपण मुलांना तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर शिकवू शकतो. समाजाच्या भावी पिढीचे आरोग्य आणि भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी ही एकत्रित जबाबदारी आपण सर्वांनीच पार पाडली पाहिजे.

# घरमालक, भाडेकरूंसाठी एप्रिलपासून होणार 'हे' नवीन नियम लागू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घरभाडे भत्ता (एचआरए) क्लेम करणे आता पूर्वीसारखे सोपे राहणार नाही. नव्या आयकर नियमांनुसार भाडे सवलत घेणाऱ्या करदात्यांना घरमालकाशी असलेले नाते स्पष्टपणे जाहीर करावे लागणार आहे. नवीन आयकर अधिनियम २०२५ अंतर्गत हे महत्त्वाचे बदल प्रस्तावित करण्यात आले असून, १ एप्रिल २०२६ पासून हे नियम लागू होणार आहेत.

सरकारने यासाठी नवीन ड्राफ्ट नियम आणि फॉर्म जाहीर केले असून, अंतिम अधिसूचना लवकरच जारी होणार आहे. या बदलांमध्ये सर्वाधिक लक्षवेधी बदल म्हणजे नवीन फॉर्म १२४. या फॉर्मनुसार एचआरए क्लेम करताना कर्मचाऱ्यांना ज्या घरमालकाला भाडे दिले जाते, त्याच्याशी आपले कौटुंबिक किंवा इतर कोणतेही नाते आहे का, हे स्पष्ट करणे बंधनकारक असेल. सध्याच्या व्यवस्थेत ही माहिती देणे आवश्यक नव्हते.

खोट्या भाडेपावत्यांवर अंकुश नवीन नियमांमुळे कर वाचविण्यासाठी सादर केल्या जाणाऱ्या खोट्या भाडेपावत्यांवर आळा बसण्याची शक्यता आहे. अनेकदा करदाते आई-वडील किंवा नातेवाईकांच्या नावावर भाडे दाखवितात. आता नातेसंबंध उघड करणे बंधनकारक झाल्याने अशा व्यवहारांची पडताळणी करणे सोपे होणार आहे. यामुळे एचआरए दाव्यांमध्ये पारदर्शकता वाढेल, असे कर तज्ज्ञांचे मत आहे.


काय माहिती द्यावी लागणार? नव्या नियमानुसार एचआरए क्लेम करताना पगारदार करदात्यांनी घरमालकाबाबत सविस्तर माहिती द्यावी लागेल. यामध्ये घरमालकाचे नाव, पत्ता, पॅन आणि त्याच्याशी असलेले नाते यांचा समावेश असेल. महत्त्वाचे म्हणजे कुटुंबातील सदस्यांना भाडे देण्यास कोणतीही बंदी घालण्यात आलेली नाही. मात्र, अशा व्यवहारांसाठी वैध भाडेकरार असणे आवश्यक आहे आणि भाडे रोख स्वरूपात न देता बँकेद्वारे देणे गरजेचे आहे. तसेच, घरमालकानेही आपल्या आयकर विवरणपत्रात हे भाडे उत्पन्न म्हणून दाखवणे बंधनकारक असेल.

# विकासाची झळाली की वाढत्या उष्णतेची 'वाफ'?

## सिमेंटची घरे, रस्ते काँक्रिटीकरणामुळे शहरातील तापमानात वाढ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : वाढत्या शहरीकरणामुळे निसर्गाची जागा आता सिमेंटच्या जंगलाने घेतली आहे. माती दिसेनाशी झाली असून, घरांसोबतच आता रस्तेही काँक्रीटचे तयार झालेले आहेत. यामुळे दिवसा सूर्याची प्रचंड उष्णता शोषली जाते, तर रात्री ती उत्सर्जित झाल्यामुळे शहराचे तापमान ग्रामीण भागाच्या तुलनेत ३ ते ५ अंशांनी अधिक राहत आहे. शहरी भागासोबतच ग्रामीण भागातही आता सिमेंटचे बंगले दिसू लागले आहेत. त्यामुळे सर्वत्र दिवसासोबतच रात्रीही प्रचंड उकाड्याचे वातावरण असते. ज्यांच्या घरी एसी किंवा कूलरसारखी संसाधने असतात त्यांना उन्हाळा सुसह्य होतो. मात्र, अन्य लोकांसाठी अंगाची लाही-लाही होणे रोजचेच संकट असते.



**मार्चमध्येच पारा चाळीशीकडे**

यंदा हवामानातील बदलांमुळे फेब्रुवारीअखेरपासूनच उन्हाच्या झळा बसू लागल्या आहेत. मार्च अर्ध्यावर येताच अनेक शहरांमध्ये पारा ३८ ते ३९ अंशांच्या पलीकडे गेला आहे. एप्रिल-मेमध्ये ही स्थिती अधिक भयावह होण्याची चिन्हे असून, उष्णतेच्या लाटेचा धोका वाढला आहे.

**धूलिकणांमुळे प्रदूषण वाढले**

काँक्रीट रस्त्यांच्या कडेला अनेकदा माती साचते. वाहनांच्या वेगामुळे ही माती हवेत उडते. डांबरी रस्त्यांच्या तुलनेत काँक्रीटच्या रस्त्यांवरील घर्षणामुळे सूक्ष्म धूलिकण हवेत जास्त काळ तरंगत राहतात. ज्यामुळे श्वसनाचे आजार वाढत आहेत. त्यावर उपाययोजना म्हणून अनेकजण मास्क किंवा रुमालाचा वापर करीत आहेत.

**पावसाळ्यात शहर चोकअप**

सिमेंटच्या रस्त्यांमुळे पाण्याचे नैसर्गिक स्रोत बंद झाले आहेत. पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यासाठी जागाच उरलेली नाही. परिणामी थोड्या पावसातही रस्त्यांवर वाहते. खोलगट भागात पाणी साचून विविध समस्या उद्भवतात. वाढत्या उष्म्यामुळे भूजल पातळीतही मोठी घट होत आहे.

**रात्री रस्त्यांवर झळा,**
**लोकांना उष्म्याच्या कळा**

शहरांमधील सिमेंटची बांधकामे दिवसा उष्णता शोषतात आणि रात्री सदर उष्णता वातावरण तप्त करते. यामुळे सूर्यास्त होऊनही रात्री उशिरापर्यंत रस्त्यावरून चालताना किंवा घराबाहेर उष्ण वारे अंगाला झोंबतात.

**काँक्रीट उष्णतावाहक, लवकर का तापते ?**

सिमेंट काँक्रीटची 'थर्मल मास' क्षमता अधिक असते. काँक्रीटची घनता जास्त असल्यामुळे ते सूर्याची उष्णता खोलवर शोषून घेते. डांबराचा रंग काळा असल्याने तो उष्णता शोषतो खरा, पण काँक्रीट उष्णता आत साठवून ठेवते. यामुळे दुपारी १२ नंतर हे रस्ते तापलेल्या तव्यासारखे कार्य करतात.

**शहर सिमेंटचे जंगल,**
**रस्त्यांचेही काँक्रिटीकरण**

शहरामध्ये आता मोकळी जागा शिल्लक राहिलेली नाही. पूर्वी घराभोवती अंगण किंवा माती असायची, जी उष्णता शोषून घेत असे. आता इमारतींना लागूनच सिमेंटचे रस्ते आणि पेव्हर ब्लॉक लावले जात आहेत. यामुळे पावसाचे पाणी जमिनीत जिरणे बंदच झाले आहे. परिणामी तापमान नियंत्रित न राहता वाढतेच राहते.

**तापमानात २ ते ४ अंशांपर्यंत पडतेय भर**

तज्ज्ञांच्या निरीक्षणानुसार ज्या भागात सिमेंटचे रस्ते आणि दाट लोकवस्ती आहे तेथे नैसर्गिक तापमानापेक्षा प्रत्यक्षात २ ते ४ अंश सेल्सिअस जास्त उष्णता जाणवते. डांबरी रस्ते रात्री लवकर थंड होतात. मात्र, काँक्रीट उष्णता धरून ठेवत असल्याने स्थानिक तापमानात मोठी वाढ होते.



# गडद पिवळा रंग आणि काळ्या पंखांचा सुंदर पक्षी 'हळदू'

**पक्ष्यांची ओळख**

**नाव :** हळदू / सुवर्ण मंजू
Golden Oriole
**रंग :** सोनेरी पिवळा. मात्र, पंख आणि शेपूट काळी, पाय काळे
**चोच :** फिकट गुलाबी, अणकुचीदार, चोचीखाली एक काळा पट्टा
**डोळे :** जांभळट लाल; पण अत्यंत तेजस्वी
**घरटे :** हळदू पक्षी काटेरी झाडाच्या उंचशेंड्यावर काड्या व तंतूंच्या सहाय्याने चार, पाच इंच खोल लोंबकळणारे घरटे बांधतो. मात्र, ते आतून मऊ असते.
अंडी : मादी उन्हाळ्यात तीन-चार अंडी घालते. अंड्यांचा रंग पांढरा असून, त्यावर तपकिरी ठिपके असतात.
**भक्ष :** वड, पिंपळ, उंबर व जंगलातील फळे आणि कीटक हे हळदूचे भक्ष्य आहे.
**आवाज :** हळदूचा आवाज मोठा पण मंजूळ असतो. हळदूचे कॉल बासरीच्या शीळसारखे असतात. त्या कॉलचे अर्थ साथीदारांना बोलविणे, मैत्री, धोका असू शकतात.
इतर वैशिष्ट्ये : हळदू पक्षाला लाजाळू म्हटले आहे. तो जमिनीवर कधीही दिसत नाही. गर्द दाट झाडीत दिसतो. भारतभर आढळतो. मात्र दक्षिण भारतापेक्षा उत्तर भारतात जास्त संख्येने आढळतो, अशी नोंद डॉ. सलीम अली यांनी केली आहे. अमळनेरला मिलच्या झाडीत, प्रताप तत्त्वज्ञान केंद्राच्या झाडीत तसेच वर्णेश्वर महादेव मंदिराच्या ठिकाणी दिसतो. मात्र, वृक्षतोडीमुळे सुरेल आवाजाच्या हळदूंची संख्या कमी झालेली आहे.

**संग्राहक : प्रा. प्रकाश धर्माधिकारी**
निसर्ग मित्र मंडळ, अमळनेर.

# संतश्री सद्गुरू सखाराम महाराजांचा अमळनेरात २७ एप्रिलला रथोत्सव

## अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर होणार उत्सवाचा प्रारंभ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील संतश्री सद्गुरू सखाराम महाराज विठ्ठल-रुक्मिणी संस्थानतर्फे संतश्री सखाराम महाराज यांचा वार्षिक रथोत्सव-२०२६ भक्तिमय वातावरणात साजरा होणार आहे. या उत्सवाची सुरूवात रविवार, दि. १९ एप्रिल रोजी अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर सकाळी ९ वाजता स्तंभारोपण व ध्वजारोहणाने होणार असून, विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची मांदियाळी भाविकांना पाहावयास मिळणार आहे.



१९ ते २६ एप्रिल दरम्यान दररोज सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत संत तुकाराम महाराज गाथा भजनाचे आयोजन करण्यात आले आहे. यात ह.भ.प. शारंगधर महाराज यांच्यासह इतर कीर्तनकार व वारकरी शिक्षण पाठशाळेतील विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

२६ एप्रिल रोजी ह.भ.प. मोहन महाराज बेलापूरकर यांच्या दिंडीचे आगमन होऊन रात्री कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. २७ एप्रिल रोजी अर्थात मोहिनी एकादशीच्या दिवशी सायंकाळी रथोत्सव सोहळा पार पडणार आहे. यात विविध कलाप्रदर्शन व आदिवासी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये माळीवाडा (ता. बागलाण, जि. नाशिक) येथील कलाकार सहभाग नोंदविणार आहेत. ३० एप्रिल रोजी सायंकाळी ९ वाजता संतश्री सखाराम महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रमुख दिवस साजरा होणार असून, भक्तनिवास, वाडी चौक येथे सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

१ मे रोजी सकाळी ६ वाजता पालखीच्या दिवशी भुसावळ रेल्वे बॅण्ड व सायंकाळी ५ वाजेपासून चाळीसगाव येथील श्री सद्गुरू ब्रास बँड पथकाच्या साथीने पालखी सोहळा पार पडणार आहे. २ मे रोजी ह.भ.प. मोहित महाराज बेलापूरकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल, अशी माहिती संस्थानातर्फे देण्यात आली आहे. दरम्यान, उत्सव काळात विविध स्थानिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात येणार असून, भाविकांनी मोठ्या संख्येने याप्रसंगी उपस्थित राहावे, असे आवाहन विश्वस्त मंडळाने केले आहे.

# मार्चअखेरची कामे, महत्त्वाचे मुद्दे नसल्याने साधारण सभा घेता आलेली नाही

## नगराध्यक्ष डॉ. बाविस्कर : प्रशिक्षित फायरमन नियुक्तीची प्रक्रिया राबविणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मार्चअखेरची गडबड असल्याने पालिकेची सर्वसाधारण सभा घेण्यात आली नाही. सभा घेऊ नये, असे काही आम्ही ठरविलेले नव्हते. मार्चअखेरची कामे सुरू होती. तसेच अनेक विषयांचे नियोजनही सुरू होते. सर्वसाधारण सभेसाठी विशेष असे महत्त्वाचे मुद्दे समोर आलेले नव्हते. यामुळे पालिकेची मार्च महिन्यातील साधारण सभा घेण्यात आलेली नाही. तसेच पालिकेच्या अग्निशमन विभागात प्रशिक्षित फायरमन नाही, ही वास्तवता आहे. मात्र, सदरची स्थिती सन २००३ पासून आहे. तरी देखील यासंदर्भातही संबंधितांशी चर्चा करून मार्ग काढला जाईल, अशी माहिती नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांनी दिली.



शहर विकास आघाडीच्या नगरसेवकांनी सोमवार, दि. ३० मार्च रोजी जळगावात जिल्हाधिकाऱ्यांना पालिकेच्या साधारण सभेसंदर्भात निवेदन दिले. याबाबत ते म्हणाले, की साधारण सभेसंदर्भातील निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यापूर्वी प्रथम मुख्याधिकाऱ्यांना देणे अपेक्षित होते. परंतु त्यांनी थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे धाव घेतली, हे योग्य झाले नाही. पालिका फायरमन प्रशिक्षणार्थींचा जो विषय आहे. तो आजचा नसून २००३ पासूनचा आहे. त्यानंतर अनेकवेळा पालिकेतील सत्तांतर घडले. मात्र, हा विषय यापूर्वी कधीही समोर आलेला नाही. भरती प्रक्रिया ही प्रशासकाच्या काळातही राबविण्यात आलेली नाही. पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांच्या काळातही ती झालेली नाही. मात्र याबाबत आता बातम्या प्रसिद्ध होत आहेत. फायरमन प्रशिक्षणाची तसेच नव्याने प्रशिक्षित फायरमन नियुक्तीचीही प्रक्रिया राबविली जाईल. मागील वीस-पंचवीस वर्षांतच संबंधितांना आवश्यक ते प्रशिक्षण देणे आवश्यक होते. मात्र, तसे झालेले नाही.

# भाषा आणि संस्कारांतून शिक्षण देणे आवश्यक : अलका कुबल

**पान १ वरून**

पाहुणे म्हणून उपस्थित होते.

अलकाताई कुबल म्हणाल्या, की आजच्या स्पर्धात्मक युगात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांचे विविध भाषांवर प्रभुत्व असणे गरजेचे आहे. पोदार इंग्लिश स्कूलसारख्या दर्जेदार संस्थेत प्रवेश घेतल्यास विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होऊ शकते. शाळेचा परिसर पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत निसर्गरम्य व मनोहारी असून, शाळेची भव्य-दिव्य वास्तू विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी वातावरण निर्माण करणारी आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश आजच निश्चित करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी योग्य पाऊल उचलावे. पोदार लर्न इंग्लिश मीडियम स्कूलमधून विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार होऊ शकतील, असा मला विश्वास आहे.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला नोबेल पोदार लर्न स्कूलच्या चेअरमन सौ. अर्चनाताई सूर्यवंशी व संचालक प्रशांत सूर्यवंशी यांनी अलकाताई कुबल यांच्यासह सर्व मान्यवरांचा रोपे देऊन यथोचित सन्मान केला. याप्रसंगी सौ. जयश्री पाटील व सौ. तिलोत्तमाताई पाटील यांनीही मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. त्यानंतर अलकाताई कुबल यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते २८ व २९ मार्च २०२६ रोजी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण करण्यात आले.

२८ मार्च रोजी आयोजित चित्रकला व रंगभरण स्पर्धा दोन गटांमध्ये घेण्यात आली. नर्सरी ते पहिलीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी रंगभरण, तर दुसरी ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी जलरंग, क्रेयॉन्स व कल्पकतेच्या जोरावर आकर्षक चित्रे साकारत आपली कला सादर केली. परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे कौतुक केले. स्पर्धेत प्रथम क्रमांकासाठी सायकल, द्वितीय-एज्युकेशनल लॅपटॉप, तर तृतीय क्रमांकासाठी एज्युकेशनल कीट अशी पारितोषिके देण्यात आली.

गट पहिला विजेते- प्रथम : दुर्वा पवार, द्वितीय : मयंक सपकाळे, तृतीय : संकेत पंजाबी. द्वितीय गट विजेते- प्रथम : हिमांशू पाटील, द्वितीय : सुयोग पाटील, तृतीय : रिदीक्षा पाटील. याशिवाय दुसऱ्या गटातील विद्यार्थ्यांमधून लकी ड्रॉद्वारे पाच विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून, त्यांना विशेष हवाई सफरीचे पारितोषिक जाहीर करण्यात आले.

२९ मार्च रोजी आयोजित 'मी आई जिजाऊ' वेशभूषा स्पर्धेत २५ महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. त्यात प्रथम : वैशाली सपकाळे, द्वितीय : प्रगती कंखरे, तृतीय : मेघना पवार हे पारितोषिक विजेते ठरले. त्यांना अनुक्रमे सोन्याची नथ, चांदीचा छल्ला व पैठणी अशी पारितोषिके प्रदान करण्यात आली. पारस गोल्डतर्फे ही पारितोषिके प्रायोजित करण्यात आली होती. त्याचबरोबर फॅन्सी ड्रेस स्पर्धेत लहानग्यांनी आपल्या कल्पकतेचा सुरेख आविष्कार सादर केला. यात पार्थ रोहित ठाकूर, उमैना सैफी, सैफुद्दीन जावेद, आर्या ब्राह्मणकर, रुद्रांश येवले, सवय जैन यांना मान्यवरांच्या शुभ हस्ते गौरविण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान सिनेअभिनेत्री अलकाताई कुबल यांच्यासोबत अनेकांनी फोटोसेशन करत जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी साने गुरुजी वाचनालयाचे चिटणीस प्रकाश वाघ व संचालक ईश्वर महाजन यांनी त्यांना वाचनीय पुस्तक भेट देऊन सत्कार केला. निसर्गरम्य वातावरणात उभारलेली नोबेल पोदार लर्न इंग्लिश स्कूल ही संस्था विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचा विश्वास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. तसेच यंदाचे स्कूलचे शैक्षणिक सत्र ५ जून २०२६ पासून सुरू होणार असल्याची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाला महिलांचा मोठा प्रतिसाद लाभला. सरिता खाचणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी चेअरमन सौ. अर्चनाताई सूर्यवंशी, संचालक प्रशांत सूर्यवंशी, प्रकाश वाघ, अभियंता निलेश वाघ, नीरज वाघ, अरुण सपकाळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com




# संघटन, शिस्त आणि राष्ट्राभिमान जागविणारे डॉ. केशव हेडगेवार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**जन्मदिन विशेष**


भारतीय समाजजीवनात संघटन, राष्ट्रभक्ती आणि संस्कार यांचे महत्त्व अधोरेखित करणारे महान व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. केशव बळीराम हेडगेवार. त्यांची १ एप्रिल रोजी जयंती. यानिमित्त त्यांचे कार्य, विचार आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदान यांचा पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

डॉ. हेडगेवार यांचा जन्म १ एप्रिल १८८९ रोजी नागपूर येथे झाला. लहानपणापासूनच त्यांच्यात देशभक्तीची जाज्वल्य भावना होती. ब्रिटीश सत्तेविरुद्ध असलेली चीड आणि स्वातंत्र्याची तीव्र आस यामुळे त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला. मात्र, स्वातंत्र्य मिळविण्यासाठी केवळ आंदोलन नव्हे तर समाजात संघटन, शिस्त आणि राष्ट्राभिमान जागविणे अधिक महत्त्वाचे आहे, ही जाणीव त्यांना झाली.

याच विचारातून १९२५ मध्ये त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. संघाच्या माध्यमातून त्यांनी व्यक्ती घडविण्यावर भर दिला. 'व्यक्ती घडली तर समाज घडेल आणि समाज घडला तर राष्ट्र बळकट होईल' हा त्यांचा ठाम विश्वास होता. संघाच्या शाखांमधून शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकासावर त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले.

डॉ. हेडगेवार यांच्या कार्यपद्धतीत साधेपणा, समर्पण आणि निःस्वार्थी वृत्ती दिसून येते. त्यांनी कधीही प्रसिद्धीचा मोह ठेवला नाही. त्यांचे संपूर्ण आयुष्य राष्ट्रकार्याला अर्पण झाले. त्यांचे नेतृत्व गुण, संघटन कौशल्य आणि दूरदृष्टी यामुळे आजही अनेक पिढ्या प्रेरित होत आहेत.

आजच्या काळात समाजात वाढती तणावपूर्ण परिस्थिती, विभाजनकारी प्रवृत्ती आणि मूल्यांचा ऱ्हास याच्या पार्श्वभूमीवर डॉ. हेडगेवार यांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. एकसंघ, सुसंस्कृत आणि बलवान भारत घडविण्यासाठी त्यांच्या विचारांचे आचरण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी राष्ट्रप्रेम, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांचे पालन करण्याचा संकल्प करावा, हीच अपेक्षा.



# कॉर्पोरेट नोकरी सोडली! फक्त १२ हजार रुपये गुंतविले भांडवल

## या शेतीतून प्रदीपने उभे केले लाखोंचे साम्राज्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**सक्सेस स्टोरी**

जिद्द, धैर्य आणि निसर्गावरचा विश्वास असेल, तर अगदी कमी भांडवलातूनही मोठे यश उभे करता येते याचे जीवंत उदाहरण म्हणजे तमिळनाडूतील वेल्लोरचे प्रदीप कुमार. केवळ १२ हजार रुपयांत सुरू केलेल्या त्यांच्या 'फूड फॉरेस्ट'ने आज हजारो ग्राहकांचा विश्वास जिंकला आहे आणि नैसर्गिक शेतीचा आदर्श ठरला आहे.

### कॉर्पोरेट करिअर सोडून शेतीकडे वळण्याचा निर्णय

प्रदीप कुमार यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये डिप्लोमा पूर्ण करून २०१४ मध्ये एल अँड टीमध्ये कॅम्पस प्लेसमेंट मिळविले. त्यांनी राजस्थान, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरातमधील मोठ्या पायाभूत प्रकल्पांवर अभियंता म्हणून काम केले. त्यानंतर ते टेरेक्समध्ये सर्व्हिस इंजिनिअर म्हणून कार्यरत होते. करिअर उत्तम सुरू असतानाच आईच्या मोठ्या शस्त्रक्रियेनंतर आणि स्वतःलाही किडनी स्टोनचा त्रास झाल्यानंतर त्यांनी आयुष्याचा पुनर्विचार केला. निरोगी जीवनशैली असूनही आजार का होत आहेत, याचा शोध घेताना त्यांनी अन्नातील रसायनांवर लक्ष केंद्रित केले. प्रसिद्ध कृषितज्ज्ञ नम्मलवार यांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी नैसर्गिक शेतीकडे वळण्याचा निर्णय घेतला.



### पडीक जमिनीतून उभा राहिला 'फूड फॉरेस्ट'

गावी परतल्यावर प्रदीप यांना समजले, की रासायनिक शेतीमुळे जमीन पूर्णपणे निष्प्रभ झाली आहे. सुरूवातीची एक-दोन वर्षे काहीच पीक आले नाही. मात्र त्यांनी हार मानली नाही. पिकांपेक्षा जमिनीची सुपीकता वाढविण्यावर त्यांनी भर दिला. देशी बियाणे वापरून आणि त्याच रोपांचे खत तयार करून त्यांनी जमिनीला पुन्हा जीवंत केले. हळूहळू पक्षी, गांडुळे परत आली आणि त्या ओसाड जमिनीचे रूपांतर एका समृद्ध 'अन्नवनात' झाले.

### १२ हजारांपासून लाखोंपर्यंतचा प्रवास

अत्यंत कमी भांडवलातून सुरू झालेला हा उपक्रम आज यशस्वी व्यवसायात रूपांतरित झाला आहे. प्रदीप दरवर्षी बियाण्यांमधून सुमारे ३ लाख रुपये आणि भाजीपाल्यातून २ लाख रुपये कमावतात. उत्पादन वाया जाऊ नये म्हणून ते लोणची, प्युरी आणि सुक्या भाज्यांमध्ये त्याचे रूपांतर करतात. आज १० हजारांहून अधिक ग्राहक त्यांच्या उत्पादनांवर विश्वास ठेवतात.

# जीवन के जंगल में सफलता की राह दिखाते हैं बाघ के ये गुण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बाघ कभी भी शिकार से नहीं डरता। उसकी चाल में आत्मविश्वास झलकता है। हमें बाघ से आत्मविश्वास सीखना चाहिए।

**सही संमय पर सही फैसला**

बाघ शिकार के लिए सही मौके का इंतज़ार करता है। हमें भी सही समय पर कदम बढ़ाने की आदत डालनी चाहिए।

**फोकस**

बाघ जब शिकार पर निगाह जमाता है, तो उसकी नजर बस उसी पर रहती है। उसी तरह हमें भी अपने लक्ष्य पर पूरा ध्यान केंद्रित रखना चाहिए।

**शांति**

बाघ अमूमन शांत रहता है। बस शिकार के समय ही आक्रामक दिखता है। हमें भी अपनी आक्रामकता का सही समय पर इस्तेमाल करना चाहिए।

**रफ्तार**

हमें बाघ से उसकी रफ्तार सीखनी चाहिए। हमारी सधी रफ्तार हमें सफलता के करीब ले जा सकती है।

**परिवार का महत्व**


बाघ अपने परिवार की रक्षा के लिए किसी से भी भिड़ जाता है। यह हमें परिवार के महत्व की सीख देता है।

शक्ति

बाघ हमें सिखात है कि अगर आपके जीवन के जंगल में दबदबा बनाना है तो शक्तिशाली बनना पड़ेगा।

**अकेला चलने की कला**

बाघ झुंड में शिकार नहीं करता। हमें भी अपने लक्ष्य की ओर बिना किसी का इंतजार किये निरंतर बढ़ते रहना चाहिए। बाघ के इन गुणों को हमेशा याद रख और अपने जीवन में उतार आप भी सफलता की सीढ़ी चढ़ सकते हैं।



# रिंकू सिंहचा उत्तर प्रदेशात स्पेशल गिफ्ट स्वीकारण्यास नकार!

## मुख्यमंत्री योगी कार्यक्रमात तोच धागा पकडत नेमके काय म्हणाले?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी लखनौमध्ये उत्तर प्रदेशातील पाच खेळाडूंना नियुक्तीपत्रे सुपूर्द केली. त्यांनी इतर ४० खेळाडूंना पुरस्कारही प्रदान केले. क्रिकेटपटू रिंकू सिंहचाही त्यात समावेश आहे. त्याची क्रीडा अधिकारी (आर.एस.ओ.) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, रिंकू सिंह आपले नियुक्तीपत्र घेण्यासाठी या कार्यक्रमाला उपस्थित राहिला नसल्याने भुवया उंचावल्या. यावर प्रतिक्रिया देताना योगी म्हणाले, की रिंकू आधीच एका शिबिराचा भाग होता आणि तेथेच उपस्थित होता. त्यामुळे तो येऊ शकला नाही. त्याचे नियुक्तीपत्र येथेच ठेवले असून ते त्याला नंतर दिले जाईल.

### कोणते क्रीडापटू अधिकारी झाले?

खेळाडूंना नियुक्तीपत्रे देताना योगी गंमतीच्या मूडमध्ये असल्याचेही दिसून आले. ते गंमतीने म्हणाले, की 'आमच्या गृहसचिवांनीही गल्ली-दंडा खेळला आहे. चौकार किंवा षटकार कुठेही मारले तरी, चेंडू आणि बॅट उत्तर प्रदेशचीच आहे.' गाझीपूरचे राजकुमार पालची पोलीस विभागात डीएसपी म्हणून नियुक्ती करण्यात आली. नोएडाचे ऑलिम्पिक पदक विजेता प्रवीण कुमार, इटावाचा अजित सिंह आणि गाझियाबादचा सुमीरन यांना पंचायती राज अधिकारी म्हणून नियुक्तीपत्रे मिळाली. दरम्यान, मुझफ्फरनगरचे रहिवासी प्रीतिपालची ब्लॉक विकास अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. क्रीडा संचालक आर. पी. सिंह यांनी सांगितले, की ज्या खेळाडूंना नोकरी मिळाली, त्यामध्ये रिंकू टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय क्रिकेट संघाचा भाग होता. राजकुमार पाल ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक जिंकणाऱ्या भारतीय हॉकी संघाचा सदस्य होता. याशिवाय, प्रवीण कुमारने उंच उडीत सुवर्णपदक, अजित सिंगने भालाफेकीत रौप्य पदक आणि सुमीरनने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये २०० मीटर शर्यतीत कांस्यपदक जिंकले. मुझफ्फरनगरच्या रहिवासी असलेल्या प्रीतिपालने १०० मीटर आणि २०० मीटर पॅरा-ॲथलेटिक्समध्ये कांस्यपदके जिंकली.

### योगी काय म्हणाले?

मुख्यमंत्री योगी म्हणाले, की 'या खेळाडूंनी देशाला आणि राज्याला गौरव मिळवून दिला आहे. त्यांचा सन्मान करणे ही अभिमानाची बाब आहे. सरकारने खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी २०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यामुळे त्यांना चांगल्या सुविधा आणि संधी मिळतील. आता बक्षिसाची रक्कम वाढवण्याची वेळ आली आहे. पुढील वर्षापासून बक्षिसाची रक्कम प्रत्येकी १० लाख रुपये असेल.' सध्या ती ३.११ लाख रुपये आहे. मुख्यमंत्री म्हणाले, की 'आपण नवरात्रीच्या नऊ दिवसांत शक्तीच्या विविध रूपांची पूजा करतो. ही परंपरा समाजात महिलांचा सन्मान राखण्याचा संदेश देते. 'यत्र नर्यस्तु पूज्यन्ते, तत्र देवता रमन्ते.' जेथे महिलांचा आदर केला जातो तेथे देव वास करतात. महिलांचा सन्मान आणि स्वावलंबन वाढवणे हे आमचे प्राधान्य आहे. जेव्हा युवाशक्ती पुढे येते, तेव्हा ती राष्ट्राच्या प्रगतीचा पाया बनते. तरुण आणि महिला विविध खेळांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून देशाला गौरव मिळवून देत आहेत.


# राजासारखे आयुष्य जगतोय ६६ वर्षांचा स्टारकीड

## लक्झरी लाईफस्टाईलच्या घराचे फोटो पाहून फिरतील डोळे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संजय दत्त सध्या 'धुरंधर २' सिनेमात झळकतोय. मीडिया रिपोर्टनुसार संजय दत्तने या सिनेमासाठी ९ ते १० कोटी रुपये मानधन घेतले आहे. संजय दत्त आपल्या लक्झरी लाईफस्टाईलसाठी ओळखला जातो. 'धुरंधर २' सिनेमात अभिनेता संजय दत्त 'चौधरी अस्लम' या भूमिकेत दिसतो. या सिनेमात त्याच्या अभिनयाचे सर्वत्र कौतुक होत असून, त्याच्या कामगिरीची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे.


संजय दत्त आपल्या लक्झरी घरात अगदी राजासारखे आयुष्य जगतोय. मीडिया रिपोर्टनुसार संजय दत्तची एकूण संपत्ती २९५ कोटी रुपये इतकी आहे. याशिवाय, संजय दत्त आपल्या कुटुंबासह ५० कोटी रुपये किमतीच्या एका बंगल्यात राहतो. संजय दत्तचा



बंगला अत्यंत आलिशान आणि लक्झरी आहे. येथील प्रत्येक वस्तू अत्यंत कलात्मक आणि डोळे दीपविणारी आहे. त्याच्या घरात एक प्रशस्त मंदिरही आहे.

संजय दत्तने आपल्या घरातील एका भिंतीवर आपली आई दिग्गज अभिनेत्री नर्गिस आणि वडील अभिनेते सुनील दत्त यांचे फोटो लावले आहेत. संजय दत्तची गच्चीही (टेरेस) अत्यंत काळजीपूर्वक सजविण्यात आली आहे आणि त्याच्या बाल्कनीतून एक अप्रतिम दृश्य दिसते. संजय दत्तची पत्नी मान्यता दत्त स्वतः संपूर्ण घराची देखरेख करते. त्यांच्या ड्रॉईंग रूमध्ये संजय दत्तचा एक फोटोही लावण्यात आला आहे.

संजय आणि मान्यता यांनी आपल्या घरातील भिंती मोठ्या पेंटिंग्जनी सुशोभित केल्या आहेत आणि घराच्या सजावटीसाठी हलक्या रंगांची निवड केली आहे. संजय दत्त घरी पूजा-अर्चा आणि हवन देखील करतो. तो आपली पत्नी आणि मुलांसह या धार्मिक विधींमध्ये सहभागी होतो. संजय दत्तने इन्स्टाग्रामवर आपल्या घरातील एका विशिष्ट खोलीचा उल्लेख 'कोहिनूर रूम' असा केला होता. संजय दत्तच्या घरातील स्वयंपाकघरही अत्यंत भव्य आहे.




# आशियातील १४ देशांनी वेढलेला एकमेव देश कोणता?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगभरात अनेक देश आहेत ज्यांची सीमा अनेक देशांशी जोडलेली आहे. पण आशियामध्ये एक असा देश आहे ज्याची सीमा तब्बल १४ देशांशी जोडलेली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे हा देश जगातील सर्वांत शक्तिशाली देशांपैकी एक आहे.





### १४ देशांनी वेढलेला देश

या देशाचे नाव चीन आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने जगातील सर्वांत मोठा देश रशिया आहे. त्यानंतर कॅनडा येतो, तर चीन हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा मोठा देश आहे.

### तंत्रज्ञानात आघाडीवर

चीन इतका विशाल आहे की त्याच्या सीमा १४ देशांशी जोडलेल्या आहेत. आपल्या शेजारी देशांच्या तुलनेत तो तंत्रज्ञानात खूप पुढे आहे. एकेकाळी चीन लोकसंख्येतही पहिल्या क्रमांकावर होता, पण आता भारत या यादीत अव्वल आहे.

### चीनशी सीमा असलेले १४ देश

अफगाणिस्तान, भूतान, भारत, कझाकिस्तान, किर्गिस्तान, लाओस, मंगोलिया, म्यानमार, नेपाळ, उत्तर कोरिया, पाकिस्तान, रशिया, ताजिकिस्तान आणि व्हिएतनाम.

### चीनची राजधानी

चीनची राजधानी बीजिंग आहे. येथे बौद्ध, ख्रिश्चन, इस्लाम आणि ताओ धर्म असे विविध धर्मांचे लोक राहतात. या देशाचा सुमारे एक-तृतीयांश भाग डोंगराळ आहे.

### पाच टाइम झोन

चीन इतका मोठा आहे की या देशात पाच टाइम झोन आहेत, तर भारतात फक्त एकच टाइम झोन आहे. तसेच चीनमध्ये आशियातील सर्वात मोठ्या नद्या, जसे यांग्त्से आणि पिवळी नदी. तसेच पठार, वाळवंटे आणि जंगले यांचा समावेश होतो.


शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे



# मंत्राची निवड करताना ५ मुख्य निकष लक्षात घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**१) तुमची आंतरिक ओढ :** ज्या देवतेचे नाव घेताना तुम्हाला मनापासून आनंद किंवा शांती मिळते, ती तुमची 'इष्ट देवता' असू शकते. सहसा ज्या देवाकडे तुमचे मन वारंवार वळते, तो मंत्र तुमच्यासाठी सर्वात प्रभावी ठरतो.

**२) साधनेचा उद्देश :** तुम्हाला नेमके काय साध्य करायचे आहे?
जर आत्मिक शांती किंवा मोक्ष हवा असेल, तर 'ओम नमः शिवाय' किंवा 'विष्णू सहस्रनाम' सारखे सात्त्विक मंत्र निवडावे.
जर बुद्धी आणि ज्ञान हवे असेल, तर 'गायत्री मंत्र' किंवा 'सरस्वती मंत्र' निवडावा.
जर संकट निवारण हवे असेल, तर 'हनुमान चालीसा' किंवा 'गणेश मंत्र' निवडावा.

**३) नावाक्षराची सुसंगतता :** तंत्रशास्त्रानुसार तुमच्या नावाच्या पहिल्या अक्षरावरून मंत्राची रास आणि मंत्राचे अक्षर यांची मैत्री पाहिली जाते (याला 'अकडचक्र' म्हणतात). मंत्र तुमच्यासाठी 'सिद्ध' (फळ देणारा) आहे की 'अरी' (शत्रू - जो त्रास देऊ शकतो) हे यावरून ठरते.

**४) उच्चारातील सहजता :** मंत्राचे उच्चार तुम्हाला स्पष्टपणे करता आले पाहिजेत. जर मंत्र खूप कठीण असेल आणि तुमचे लक्ष फक्त उच्चार सुधारण्यातच जात असेल, तर एकाग्रता साधणे कठीण होते. त्यामुळे सुरुवातीला सोपा आणि लयबद्ध मंत्र निवडावा.

**५) दीक्षा किंवा मार्गदर्शन :** काही शक्तिशाली 'बीज मंत्र' गुरुंच्या मार्गदर्शनाशिवाय जपणे टाळावे. जर गुरु नसतील, तर 'नाम मंत्र' (उदा.- राम कृष्ण हरी, श्री स्वामी समर्थ) निवडावेत, कारण त्यांचे कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत आणि ते सर्वांसाठी सुरक्षित असतात.
थोडक्यात ज्या मंत्रामुळे तुमचे मन एकाग्र होते आणि अंतरातून श्रद्धा निर्माण होते, तोच तुमच्यासाठी योग्य मंत्र आहे.

# क्या हनुमान जी सचमुच बिराजते हैं?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एक पंडित जी रामायण कथा सुना रहे थे। लोग आते और आनंद विभोर होकर जाते। पंडित जी का नियम था रोज कथा शुरू करने से पहले 'आइए हनुमंतजी बिराजिए' कहकर हनुमान जी का आह्वान करते थे, फिर एक घण्टा प्रवचन करते थे। वकील साहब हर रोज कथा सुनने आते। वकील साहब के भक्तिभाव पर एक दिन तर्कशीलता हावी हो गई।

उन्हें लगा कि महाराज रोज 'आइए हनुमंत जी बिराजिए' कहते हैं तो क्या हनुमान जी सचमुच आते होंगे! अतः वकील साहब ने पंडित जी से पूछ ही डाला- महाराज जी, आप रामायण की कथा बहुत अच्छी कहते हैं। हमें बड़ा रस आता है परंतु आप जो गद्दी प्रतिदिन हनुमान जी को देते हैं उसपर क्या हनुमान जी सचमुच बिराजते हैं? पंडित जी ने कहा हाँ यह मेरा व्यक्तिगत विश्वास है कि रामकथा हो रही हो तो हनुमान जी अवश्य पधारते हैं। वकील ने कहा महाराज ऐसे बात नहीं बनेगी। हनुमान जी यहां आते हैं इसका कोई सबूत दीजिए। आपको साबित करके दिखाना चाहिए कि हनुमान जी आपकी कथा सुनने आते हैं। महाराज जी ने बहुत समझाया कि भैया आस्था को किसी सबूत की कसौटी पर नहीं कसना चाहिए यह तो भक्त और भगवान के बीच का प्रेमरस है, व्यक्तिगत श्रद्धा का विषय है। आप कहो तो मैं प्रवचन करना बंद कर दूँ या आप कथा में आना छोड़ दो। लेकिन वकील नहीं माना, वो कहता ही रहा कि आप कई दिनों से दावा करते आ रहे हैं। यह बात और स्थानों पर भी कहते होंगे,इसलिए महाराज आपको तो साबित करना होगा कि हनुमान जी कथा सुनने आते हैं। इस तरह दोनों के बीच वाद-विवाद होता रहा। मौखिक संघर्ष बढ़ता चला गया। हारकर पंडित जी महाराज ने कहा हनुमान जी हैं या नहीं उसका सबूत कल दिलाऊंगा। कल कथा शुरू हो तब प्रयोग करूंगा। जिस गद्दी पर मैं हनुमानजी को विराजित होने को कहता हूं आप उस गद्दी को आज अपने घर ले जाना। कल अपने साथ उस गद्दी को लेकर आना और फिर मैं



कल गद्दी यहाँ रखूंगा। मैं कथा से पहले हनुमानजी को बुलाऊंगा, फिर आप गद्दी ऊँची उठाना। यदि आपने गद्दी ऊँची कर दी तो समझना कि हनुमान जी नहीं हैं। वकील इस कसौटी के लिए तैयार हो गया। पंडित जी ने कहा हम दोनों में से जो पराजित होगा वह क्या करेगा, इसका निर्णय भी कर लें ?.... यह तो सत्य की परीक्षा है। वकील ने कहा- मैं गद्दी ऊँची न कर सका तो वकालत छोड़कर आपसे दीक्षा ले लूंगा। आप पराजित हो गए तो क्या करोगे? पंडित जी ने कहा मैं कथावाचन छोड़कर आपके ऑफिस का चपरासी बन जाऊंगा। अगले दिन कथा पंडाल में भारी भीड़ हुई जो लोग रोजाना कथा सुनने नहीं आते थे,वे भी भक्ति, प्रेम और विश्वास की परीक्षा देखने आए। काफी भीड़ हो गई। पंडाल भर गया। श्रद्धा और विश्वास का प्रश्न जो था। पंडित जी महाराज और वकील साहब कथा पंडाल में पधारे... गद्दी रखी गई। पंडित जी ने सजल नेत्रों से मंगलाचरण किया और फिर बोले 'आइए हनुमंत जी बिराजिए' ऐसा बोलते ही पंडित जी के नेत्र सजल हो उठे। मन ही मन पंडित जी बोले प्रभु ! आज मेरा प्रश्न नहीं बल्कि रघुकुल रीति की परंपरा का सवाल है। मैं तो एक साधारण जन हूँ। मेरी भक्ति और आस्था की लाज रखना। फिर वकील साहब को निमंत्रण दिया गया आइए गद्दी ऊँची कीजिए। लोगों की आँखे जम गईं। वकील साहब खड़े हुए। अगर आपको कथा संग्रह की पोस्ट पसंद आती है तो आज ही सब्सक्राइब करें कथा संग्रह उन्होंने गद्दी उठाने के लिए हाथ बढ़ाया पर गद्दी को स्पर्श भी न कर सके ! जो भी कारण रहा, उन्होंने तीन बार हाथ बढ़ाया, किन्तु तीनों बार असफल रहे।
पंडित जी देख रहे थे, गद्दी को पकड़ना तो दूर वकील साहब गद्दी को छू भी न सके। तीनों बार वकील साहब पसीने से तर-बतर हो गए। वकील साहब पंडित जी महाराज के चरणों में गिर पड़े और बोले महाराज गद्दी उठाना तो दूर, मुझे नहीं मालूम कि क्यों मेरा हाथ भी गद्दी तक नहीं पहुंच पा रहा है। अतः मैं अपनी हार स्वीकार करता हूँ। कहते है कि श्रद्धा और भक्ति के साथ की गई आराधना में बहुत शक्ति होती है। मानो तो देव नहीं तो पत्थर। प्रभु की मूर्ति तो पाषाण की ही होती है लेकिन भक्त के भाव से उसमें प्राण प्रतिष्ठा होती है तो प्रभु बिराजते है।
श्री राम जी की जय.....

हे नाथ! हे मेरे नाथ!! आप कृपा के सागर है।

# कठीण परिस्थितीतही शांत राहतात 'या' तारखेला जन्मलेले लोक

## नशिबाचे असतात श्रीमंत, काय आहे यांचे गुपित?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अंकशास्त्रानुसार प्रत्येक मूलांकाचे स्वतःचे एक वैशिष्ट्य असते. जे त्याला इतरांपेक्षा वेगळे बनवते. कठीण परिस्थितीत घाबरून जाणे ही सामान्य गोष्ट आहे. परंतु आपण अशा एका मूलांकाबद्दल जाणून घेणार आहोत, जो प्रतिकूल परिस्थितीत डगमगण्याऐवजी आपल्या समजूतदारपणाने त्या संकटातून बाहेर पडतो.

### काय सागते अकशास्त्र?


आपण मूलांक २ असलेल्या व्यक्तींबद्दल बोलत आहोत. ज्या लोकांचा जन्म कोणत्याही महिन्याच्या २, ११, २० किंवा २९ तारखेला झाला असेल, त्यांचा मूलांक २ मानला जातो. या मूलांकाचा अधिपती 'चंद्र' आहे. चंद्राच्या प्रभावामुळे या व्यक्ती शांत, संयमी आणि विचारशील असतात. अंकशास्त्रानुसार मूलांक २ च्या व्यक्ती कठीण प्रसंगातही आपला ताबा सोडत नाहीत. आपला संयम राखून, त्या आव्हानांवर मात करण्याचा मार्ग त्या यशस्वीपणे शोधून काढतात.

### 'या' गोष्टी बनवतात इतरांपेक्षा वेगळे

अंकशास्त्रानुसार मूलांक २ चे लोक नशिबाचे श्रीमंत असतात. आत्मविश्वासाच्या बाबतीत बोलायचे झाले तर, तो यांच्यात ठासून भरलेला असतो आणि त्यांना इतरांवर अवलंबून राहणे आवडत नाही. आपल्या बुद्धिमत्तेचा वापर करून ते खूप नाव कमावतात. हे लोक मुख्यत्वे शिक्षण, कला, अभिनय, लेखन, संगीत किंवा समुपदेशन यांसारख्या क्षेत्रांत आपली ओळख निर्माण करतात.

### त्यांच्या कमकुवत बाजू

मूलांक २ असलेल्या व्यक्तींच्या कमकुवत बाजूंचा विचार करता, त्या अत्यंत भावुक असतात आणि या स्वभावाचा



इतर लोक अनेकदा गैरफायदा घेतात. या व्यक्तींना अतिविचार करण्याची सवय असते, ज्यामुळे त्यांना कधीकधी अडचणींचा सामना करावा लागू शकतो. याव्यतिरिक्त, या मूलांकाशी संबंधित व्यक्तींमध्ये काही प्रमाणात अस्वस्थता आणि तात्पुरती आत्मविश्वासाची कमतरता देखील दिसून येऊ शकते.

# समुद्रकिनारी वसलेले श्रीक्षेत्र गणपतीपुळे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रीक्षेत्र गणपतीपुळे हे रत्नागिरी जिल्ह्यातील एक प्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे. हे गणपती बाप्पा स्वयंभू आहेत आणि या बाप्पांचे स्थान समुद्रकिनारी वसलेले असे अतिशय मनमोहक आणि अस्थिर मनाला शांतात देणारे आहे. या मंदिराची अनेक खास वैशिष्ट्ये आहेत. हे मंदिर समुद्रकिनारी असून किनारा आणि मंदिर यातील अंतर जेमतेम काही मिनिटांचेच आहे.

कोकणातील प्रत्येक देवी-देवतांबद्दल अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. आपण श्रीक्षेत्र गणपतीपुळेबद्दल माहिती जाणून घेणार आहोत. रत्नागिरीतील सुप्रसिद्ध असे तीर्थक्षेत्र म्हणजे गणपतीपुळे. कोणताही पर्यटक रत्नागिरीमध्ये आल्यावर स्वयंभू गणेशाचे दर्शन घेतल्याशिवाय पुढे जाऊच शकत नाही. गणपतीपुळे मंदिर आणि परिसर एवढा आकर्षक आहे, की पाऊले आपोआपच मंदिराकडे वळतात.

कोणत्याही शुभ कार्याची सुरूवात करताना श्रीगणेशांना वंदन करूनच कार्य सिद्धीस नेण्याची प्रार्थना केली जाते. गणपती हे शिवशंकर आणि पार्वती मातेचे सुपुत्र असा पुराणात उल्लेख आहे. गणांचा ईश म्हणजेच गणेश आणि गणांचा अधिपती म्हणजे गणपती. गणपतीपुळे येथील गणपतीच्या मूर्तीची एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. ही गणपतींची मूर्ती साधारण ४०० वर्षांची आहे. गणपतीपुळ्यातील हे देवस्थान पश्चिमद्वारी आहे. आज ज्या ठिकाणी स्वयंभू गणपतीचे मंदिर आहे त्या ठिकाणी हजारो वर्षांपूर्वी फक्त एक डोंगराच्या पायथ्याशी असलेले केवड्याचे बन होते. या परिसरामध्ये अगदी हातावर मोजण्याइतकीच वस्ती होती.

बाळंभटजी भिडे नामक ब्राह्मण त्या ठिकाणी वास्तव्याला होते. त्यावेळी खोतकीच्या प्रथा असत आणि ते गावचे खोत



म्हणून ओळखले जात असत. एके दिवशी भिडेंवर अचानक संकट ओढवले आणि त्यातून मुक्ती मिळविण्यासाठी भिडे यांनी आराध्य देवता श्रीगणेशांची उपासना करण्यासाठी केवड्याच्या बनात तपस्या करण्यासाठी बसले आणि तेथे निश्चय केला, की या संकटाचे जोपर्यंत समूळ निवारण होत नाही तोपर्यंत मी अन्नग्रहण करणार नाही.

दृढनिश्चयी असणाऱ्या भिडे यांना एके दिवशी गणपतींनी दृष्टांत दिला, की 'मी या ठिकाणी भक्तांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी गणेशगुळे येथून दोन गंडस्थळे व दंतयुक्त स्वरूपामध्ये प्रकट झालो आहे. माझी मनोभावे सेवा, अनुष्ठान, पूजा-अर्चा कर, तुझी सर्व संकटे दूर होतील'.

नेमक्या याच कालावधीमध्ये भिडे यांची गाय काही दिवस दूध देत नव्हती. पण गुराख्याने गाईतील काही विशेष लक्षणे जाणली होती, आणि तिच्यावर पाळत ठेवून राहिला. तेव्हा त्याला निदर्शनास आले, की डोंगरावरील एका शिळेवर गाय दुधाची संततधार सोडत आहे, हा प्रकार त्याने खोतांना सांगितला. त्यांनी लागलीच सर्व परिसराची स्वच्छता केली तर तेथे त्यांना दृष्टांतातील गणेशांची मूर्ती आढळली. भिडेनी त्या ठिकाणी गवताचे छप्पर बांधून एक छोटेसेच मंदिर स्थापन केले. त्याच छोट्याशा मंदिराचे विस्तारीत रूप म्हणजे श्रीक्षेत्र गणपतीपुळे. या गावाला हे नाव कसे प्राप्त झाले, त्याबद्दलही थोडे जाणून घेऊया. अर्थात त्याचीही एक कथा आहे.

बऱ्याच वर्षापूर्वी आत्ता जो गजबजलेला गणपतीपुळे गाव आहे, तशी काही चिन्हेच नव्हती. गावामध्ये विशेष अशी वस्ती देखील नव्हती. गावाच्या उत्तरेच्या बाजूपासून वस्तीला सुरूवात झाली. गावाची पश्चिम दिशेकडे उतरण असून, बराचसा भाग पुळणीचा आहे, पुळणीच्या लगतच असेलेले हे स्वयंभू गणपतीचे स्थान म्हणून या गावाची गणपतीपुळे नावाने सर्वदूर ख्याती आहे.

गणपतीपुळेला लाभलेला समुद्र किनारा अतिशय स्वच्छ व निळ्याशार पाण्याचा असल्याने मंदिरासोबत समुद्राचा आनंद लुटण्यासाठी सगळ्या ऋतूमध्ये पर्यटकांची गर्दी दिसून येते. गणपतीपुळेला प्रवेश करतानाच संस्थान श्रीक्षेत्र गणपतीपुळे लिहिलेली एक मोठी कमान उभारण्यात आली आहे. तेथून आतमध्ये काही पावले चालल्यावर मंदिराचे हळूहळू दर्शन घडून यायला सुरुवात होते. दोन बाजूंनी उंचच्या उंच डोंगरामध्ये वसलेलं हे स्वयंभू गणेशाच मंदिर. मंदिराच्या आत शिरतांना बाहेर एक मोठा मूषकराज हात जोडलेल्या रुपात नजरेस पडतो. त्याच्याबद्दल सुद्धा एक दंतकथा आहे. एवढ्या गर्दीच्या ठिकाणी मनातील इच्छा देवाजवळ मनमोकळेपणे व्यक्त तर करता आली पाहिजे. म्हणून असे म्हणतात, की या उंदराच्या मूर्तीच्या एका कानावर हात ठेवून, दुसऱ्या कानामध्ये जे आपले मागणे असेल देवाकडे, ते सांगितले की ते प्रत्यक्ष गणपतींना ऐकू येते आणि देव लवकरात लवकर त्याची प्रचिती भक्तांना देतात. यामागे सुद्धा श्रद्धेचा भाग आहे. आतमध्ये गेल्यावर गाभाऱ्यातील गणपतींचे प्रत्यक्ष दर्शन घेतल्यावर जी मनाला शांती लाभते ती अवर्णनीय आहे. त्यानंतर मंदिराच्या सभामंडपात काही काळ बसून, देवाचे चिंतन करणे म्हणजे परमसुख. त्याच सभामंडपामध्ये वरच्या बाजूला अथर्वशीर्ष लिहिलेले असून, सर्व भिंतींवर विविध स्तोत्रे लिहिली आहेत.

### प्रदक्षिणा मार्ग

गणेशांची मूर्ती ही स्वयंभू असल्याने मंदिराला प्रदक्षिणा घालण्यासाठी संपूर्ण डोंगराला प्रदक्षिणा घालावी लागते. हा परिसर साधारण १ कि.मी.चा असून, चिऱ्यांची मजबूत पाखाडी त्याला केली आहे. प्रदक्षिणा मारताना अधी-मधी लहान मंदिरे आणि नामजप लिहिलेले आहेत. मंत्रमुग्ध होऊन सुरू केलेली प्रदक्षिणा तल्लीन होऊन कधी पूर्ण होते हे कळतच नाही. सुरूवात आणि शेवट तिचा मंदिरामध्येच होतो हे विशेष.

मंदिराच्या बाहेर दोन्हीं बाजूला पाच त्रिपूरं आहेत. विशेष करून त्रिपूरारी पौर्णिमेला मंदिराची रोषणाई त्यावरील दिवे प्रज्वलित करून होते. त्या पौर्णिमेचे मंदिराचे दिसणारे प्रकाशमान रुप डोळ्याचे पारणे फेडण्यासारखे असते. मंदिराच्या परिसरामध्ये अनेक छोटी मोठी दुकाने आहेत, गणपती विविध रूपातील मूर्ती, पुजा साहित्य, लाकडी खेळणी, विविध रोपांची नर्सरी, खाद्य पदार्थांची दुकाने यांचा मोठ्या प्रमाणात आहेत.

### खिचडी प्रसाद

दर्शन घेऊन झाले, की भुकेची जाणीव पोट करून देतेच. दुपारी प्रसाद म्हणून मंदिर प्रशासनाच्या माध्यमातून दुपार आणि सायंकाळच्या आरतींनंतर खिचडी भात-लोणचे, शिरा, साबूदाणा खिचडी, गोड बुंदी, खोबरे गुळाचा चुण इत्यादी विविध प्रकारच्या प्रसादाचा समावेश असतो. प्रसादाची चव एवढी अप्रतिम असते, की त्यापुढे पंचपक्वान्न सुद्धा फिके पडते. या अन्नछत्रासाठी दिवसागणिक दान देण्याची सुविधा सुद्धा उपलब्ध आहे. मंदिरासमोरच असणारा स्वच्छ समुद्र किनारा, त्यावर वाळूवर चालताना मध्येच शहाळे विकणारे, शेंगदाणे विकणारे यांचा आस्वाद घेणे जरूरीचे असते किंवा शांतपणे वाळूवर बसून सूर्याचा अस्त न्याहाळण्याची मजा काही औरच.

### गणेशोस्तवामधली गावातील प्रथा

अंगारकी, संकष्टी आणि माघ महिन्यातील चतुर्थीला गणपतीपुळेला जत्रेच स्वरूप प्राप्त झालेलं असते. मंदिर परिसराच्या सुशोभीकरणामुळे हे देवस्थान अधिकच खुलून दिसते, मंदिराला केलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईमुळे भाविक आणि पर्यटक आपसूकच तिथे आकर्षिले जातात. भाद्रपद महिन्यामध्ये सर्वांच्या घरी गणपती विविध रूपाने विराजमान होतात. परंतु, रत्नागिरीमधील अशी दोन गावे आहेत, जिथे कोणाच्याही घरी घरगुती स्वरूपातील गणपतीच्या मूर्तीची स्थापना केली जात नाही. ती गावे म्हणजे गणपतीपुळे आणि गणेशगुळे. या दोन्ही ठिकाणच्या मंदिरातील गणपतीच्या स्वयंभू मूर्तींचीच पूजा स्थानिक नागरिक येऊन करतात.

### गणपतीपुळेजवळील पर्यटनस्थळे

गणपतीपुळेमध्ये आजूबाजूच्या परिसरामध्येही अनेक पर्यटन स्थळे निर्माण झाली आहेत. त्याचप्रमाणे पर्यटकांच्या मनोरंजनासाठी विविध प्रकल्प तेथे राबविले जातात. गणपतीपुळे पासून काहीच अंतरावर प्राचीन कोकण म्हणून एक स्थळ आहे. ज्यामध्ये कोकणाचा प्राचीन काळातील समाज, त्यांच्या वेशभूषा, पेहराव व केशभूषा, बारा बलुतेदार, जुनी घरगुती, शेतीची वापरली जाणारी उपकरणे व हत्यारे, मातीची भांडी, लाकडी विविध प्रकारची भांडी, पुरातन काळातील मंदिरांचे नमुने, घरे यांच्या सहाय्याने इतिहास जिवंत केला आहे. अनेक प्रकारची औषधी झाडांची लागवड तिथे केली आहे. त्याचप्रमाणे राशीनुसार झाडे आणि त्यांचे उपयोग अशी एक अनोखी संकल्पना सुद्धा तिथे राबविण्यात आली आहे. साधारण 3 एकर जागेमध्ये एक कोकणी गाव येथे उभारण्यात आला आहे. माफक तिकिट दरामध्ये तेथील स्थानिक गाईडच्या सहाय्याने आपल्याला प्राचीन कोकणबद्दलची इत्यंभूत माहिती मिळते. तिथे सुद्धा खाण्यापिण्याची चंगळ पहायला मिळते ते सुद्धा पारंपारिक पदार्थ म्हणजे अगदी थालीपीठ, अळूवडीपासून मोदकापर्यंत ते गारेगार कोकम, आवळा, जांभूळ सरबताचा आस्वाद घ्यायला मिळतो.

गणपतीपुळेपासून सुमारे २ कि.मी. अंतरावर मालगुंड हे प्रसिद्ध कवी केशवसुतांचे जन्मस्थान असून गावामध्ये त्यांचे स्मारक देखील पाहायला मिळते. त्याबरोबर मत्स्यालय, वॅक्स म्युझियम, मॅजिक मिरर, प्राचीन कोकण संग्रहालय, जयगड किल्ला, कऱ्हाटेश्वर मंदिर, जय विनायक मंदिर आणि त्याचा अप्रतिम रचनेचा बगीचा परिसर, आरे-वारेचा भव्य अथांग असा समुद्र किनारा हे गणपतीपुळेजवळील इतर आकर्षण स्थळ आहेत.

### गणपतीपुळेला पोहोचायचे कसे?

रत्नागिरीहून गणपतीपुळे ४० कि.मी. अंतरावर आहे. गणपतीपुळे येथे जाण्यासाठी मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर इत्यादी शहरांतून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने थेट बससेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. रत्नागिरीमधून तर दर अर्ध्या तासाच्या अंतराने गणपतीपुळे आणि लगतच्या परिसरामध्ये जाणाऱ्या बस सुरू असतात. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरून गेल्यास निवळी फाट्यावरून उजव्या हाताला वळले की साधारण ३२ किलोमीटर अंतरावर गणपतीपुळे आहे. मुंबई अथवा गोव्यावरून येणाऱ्या लोकांसाठी हा बाहेरील निवळीमार्ग अतिशय उत्तम आहे.

मुंबईवरून येणाऱ्या पर्यटकांना रेल्वेने रत्नागिरी स्टेशनपर्यंत येऊन पुढील प्रवास एस.टी. अथवा खासगी वाहनाने करणे शक्य आहे. अशी अनेक वाहने उपलब्ध सुद्धा असतात अथवा पूर्वनियोजित एखादे वाहन बुक करून ठेवले, तर ते त्याहून योग्य ठरेल. त्याचप्रमाणे आता समुद्रीमार्गे सुद्धा वाहतूक सुरू करण्यात येणार असल्यामुळे गणपतीमुळे आता काही तासांच्या अंतरावर उपलब्ध होऊ शकणार आहे.

गणपतीपुळे येथे राहण्यासाठी मोठ्या संख्येने रिसॉर्टस् आणि हॉटेल उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे भक्तनिवास, काही होम स्टे सुद्धा आहेत. तसेच राज्य शासनाचे एमटीडीसीची निवास्थानेसुद्धा जवळ उपलब्ध आहेत. ऑनलाईन बुकिंगची सुद्धा सोय उपलब्ध आहे. समुद्रकिनारी आता बोट क्लब सुद्धा झाल्याने वॉटर स्पोर्टस्‌चा सुद्धा मोठ्या प्रमाणात आनंद लुटता येणार आहे.

**गणपती बाप्पा मोरया...!**

### गणपतीपुळेची प्रसिद्ध आरती

**आरती सुंदर वदनाची । गिरिजा शशिघर तनयाची ।**
**स्वयंभू पश्चिम दिग्विसी । प्रकटला भक्त रक्षणासी ।**
**सन्मुख सागर समदृष्टी । शोभतो हरित गिरिपृष्टी ।**
**विराजे सिंदुर सर्वांगा । वाहते सव्य नाभीगंगा ।**
**वर्णु काय तीर्थ महिमा ऽऽऽ ।**
**स्थान हे पुलिन, असे जरी विजन, निवासे परम कृपेने पावन ते जाणिले ।**
**त्रिभूवनी क्षेत्र धन्य झाले । देखता मूर्ती गणेशाची । होईना तृप्ती नयनांची ॥१॥**
**आरती सुंदर वदनाची । गिरिजा शशिघर तनयाची ।**
**जय जय सुमुख एकदंता । वरदा ऋद्धिसिद्धीकांता ।**
**जपता द्वादश नामांसी । कामना सिद्धी पदा नेसी।**
**शोभवी प्रणव रुप वदना । क्षाळितो तीर्थराज चरणां।**
**अहा ती अस्तसमय शोभाऽऽऽ ।**
**पूजितो तरणी। स्वर्णमय किरणी ।**
**निनदे गगनी । गर्जना मंद अंबुधीची । चालते दिव्य दुंदुभीची ।**
**आरती सुंदर वदनाची । गिरिजा शशिघर तनयाची ॥२॥**
**भाद्रपद शुद्ध चतुर्थीला । भक्तगण येत दर्शनाला ।**
**उगवता धन्य माघमास । लागते रीघ यात्रिकांस ।**
**सकलजन नारी-नर येती । दर्शने पाप मुक्त होती ।**
**काय तो यात्रेचा दिवस ऽऽऽ ।**
**मिळेना वाट, उसळली लाट, स्वारीचा थाट, दाटते गर्दी भाविकांची ।**
**पालखी निघे मोरयाची ।**
**आरती गाऊनी सदभावे । त्रिविक्रम शांतिसुखा पावे ।**
**आस ही पुरवी दासाची । भक्ती दे अखंड चरणाची ।**
**आरती सुंदर वदनाची । गिरिजा शशिघर तनयाची ।**

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**